**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-2024**

# जीवनात आनंद निर्माण करण्याचे काम कविता करत असते : प्रा. डॉ. काटे

**पाटण, दि. २३ :** माणसाच्या भावनांशी आणि त्यांच्या जीवनाशी निगडीत सर्वच घटकांमध्ये सकारात्मक दृष्टीने पाहून जीवनात आनंद निर्माण करण्याचे काम कविता करत असते, असे मत प्रा. डॉ. सौ. हेमलता काटे यांनी व्यक्त केले.

टोळेवाडी, ता. पाटण येथे बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. पांडुरंग अहिवळे होते.

यावेळी टोळेवाडी गावचे माजी सरपंच नारायण डिगे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, प्रा. डॉ. भरत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. सौ. काटे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराचे महत्त्व सांगितले. स्वलिखित तिचं जगणं या काव्य संग्रहातील काही मोजक्या कविता सादर केल्या.

प्रा. डॉ. ऐवळे म्हणाले, कविता समजून घेता आली पाहिजे. एखादी भावना उचंबळून आली की कविता मनात उमटायला लागते आणि नंतर ती कागदावर अवतरते असा हा कवितेचा प्रवास असतो. तरल आणि संवेदनशील मन हे कवितेला पूरक असते असे सांगून त्यांनी सादर केलेल्या शीघ्र हास्य कवितांनी शिबिरातील विद्यार्थ्यांना खळखळून हसविले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर श्रम संस्कार शिबिरातील स्वयंसेवकानी त्यांना आवडलेल्या, भावलेल्या कविता म्हणून दाखविल्या विद्यार्थ्यांनी गायलेल्या शिवाजी महाराज यांच्या वरील पोवाड्याने कार्यक्रमात उत्साह निर्माण झाला.

प्रकल्प अधिकारी प्रा. बळीराम लोहार यांनी प्रास्ताविक केले. तेजश्री झोरे हिने आभार मानले.

मंदा मोळावडे हिने सुत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्रा. सौ. इंदू साळुंखे, प्रा. सौ. पट्टेबहादूर, प्रा. श्रीगणेश गायकवाड, गोरख सुपुगडे, मौजे टोळेवाडी गांवचे ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.




**मार्गदर्शन करताना डॉ. हेमलता काटे, व्यासपीठावर नारायण डिगे, डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, डॉ. भरत जाधव.**